समता शिक्षण संस्था, पुणे

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता. जि. धुळे**

---

*दि. ७/११/२०१७*

# *अहवाल*

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन "७ नोव्हेंबर विद्यार्थी दिवस"**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे व सामाजिक न्याय विभागाचे, समाजकल्याण कार्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०७/११/२०१७ रोजी वेळ ठिक सकाळी ठिक ११:०० वाजता "विद्यार्थी दिवस" म्हणुन कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर अध्यक्षस्थानी होते. तर सदरील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.डॉ. सुदाम राठोड सर उपस्थित होते. सदरील कार्यक्रमात सुरुवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येऊन पुष्पहार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अर्पण करण्यात आला.

महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी असे सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दि. ७ नोव्हेंबर १९०० या दिवशी प्रतासिंग हायस्कुल, राजवाडा चौक, जि. सातारा येथे प्रथम शाळेत प्रवेश झाला होता. डॉ.आंबेडकरांचे शाळेत पाऊल पडल्यामुळेच ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले. करोडो दलितांचे, वंचितांचे उध्दारकर्तेही झ ाले. त्यांनी विविध राज्यघटनेचा अभ्यास करुन आपल्या देशाची राज्यघटना लिहिली आजही राज्यघटना आदर्श मानली जाते आणि जगभर तीचा गौरव देखिल केला जातो. परिणामतः भारतीय समाजात, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवी मुल्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रुजवली. म्हणुनच त्यांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची बाब आहे. शिक्षण हेच उन्नतीचे साधन आहे. आजन्म विद्यार्थी म्हणुन ज्ञान घेण्याची त्यांची इच्छा कधीच खंडीत झाली नाही. म्हणुनच शासनाने त्यांचा शाळा प्रवेश हा दिवस विद्यार्थी दिवस साजरा करावयाचे

ठरविले आहे. ***जिथे माणसा-माणसात भेद आहे, त्या पुस्तकाचे नाव वेद आहे. जिथे प्रत्येक व्यक्ती समान आहे, त्या ग्रंथाचे नाव भारतीय संविधान आहे.***

प्रा. गजेद्र जगदेव यांच्या प्रास्ताविकानंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बालपनावर आधारीत चित्रफीत सर्व उपस्थितांना दाखविण्यात आली. चित्रफीत पाहिल्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी अमीर झारी व माधवी पवार या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाल जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व वक्ते प्रा.डॉ. सुदाम राठोड यांनी आपल्या भाषणात, ७ नोव्हेंबर विद्यार्थी दिवस म्हणुन आजचा ऐतिहासिक दिवस म्हणुन  साजरा केला जात आहे. शिक्षणाचा सकारात्मक विचार करणारा दिवस आहे. डॉ.बाबासाहेबांचे योगदान दलित, वंचित, सोषितांसाठी अर्पीत केले असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे यांनी सुरुवातील महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाचे अभिनंदन केले तसेच उपस्थित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील विद्यार्थ्यीयांचेही अनिभनंदन केले. पुढे सरांनी प्रथमच आपल्या महाविद्यालयात विद्यार्थी दिन साजरा करीत आहोत. या देशात अनेक लोक जन्माला आले व त्यांनाही आपल्या कार्याचा ठसा उमटवला परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक अडचणीतुन शिक्षणाच्या पदव्या घेतल्या आहेत. त्यांनी शिक्षण घेऊन समाजाचा, देशाचा विकास करण्याचे काम केले. म्हणुन हा दिवस विद्यार्थी दिवस म्हणुन साजरा केला जात आहे.अनेकांचे दिवस साजरे होत होते परंतु विद्यार्थ्यांचा कुठेतरी दिवस साजरा व्हावा म्हणुन ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणुन संपुर्ण महाराष्ट्रात साजरा केला जात आहे.

सदरील कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केले होते. माधवी पवार या विद्यार्थ्यीनीने कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी आणि विद्यार्थ्यी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता ग्रंथालयातील कर्मचारी श्री. सुभाष बागुल, श्री. विजय आगळे, श्री.सुधिर पाटील, श्री. विशाल भदाणे,  श्री. मनोज ठाकरे, श्रीमती, आम्रपाली सुर्यवंशी यांनी प्रयत्न केले.

**ग्रंथपाल**
**प्रा. गजेंद्र जगदेव**


शिक्षण संस्था, पुणे संचलित
आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय
e-mail : msw_college@rediffmail.com
ंथालयातर्फे आयोजित
७ नोव्हेंबर
विद्यार्थी दिन


बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय






डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय
७ नोव्हेंबर
विद्यार्थी दिन


TOILET
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय
७ नोव्हेंबर
विद्यार्थी दिन